दिनांक २७/०७/२०१७

१) दिनांक २६/०७/२०१७ रोजी मिळालेल्या गुप्त बातमिदाराच्या खबरेवरुन मा. पोलीस अधिक्षक सो. यांचे आदेशान्वये तसेच मा. अपर पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली नामे- विशाल दादाजी सांगोळे, वय-३३ वर्षे तसेच तौशिफ शेख दोन्ही रा. कुरखेडा ता. कुरखेडा जिल्हा गडचिरोली हे दोघे संगनमताने अवैधरित्या देशी/विदेशी दारुची साठवणुक करुन विक्री करणार आहेत अशा खात्रीशीर खबरेवरुन मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थागुशा, गडचिरोली येथील दारुबंदी पथकाने मौजा कुरखेडा येथील नमुद आरोपीने भाडयाने घेतलेल्या नामे- सौ. रेखा नामदेव येलतुरे, रा. कुरखेडा हिचे मालकीचे घराची दोन प्रतिष्ठीत पंचासमक्ष अवैधदारु संदर्भात घर झडती घेतली असता तिने भाडयाने दिलेल्या खोलीतून देशी/विदेशी अवैध दारुचा साठा मिळून आला, त्याची किंमत ११,२१,७६०/- रु. चा माल अवेधरित्या साठवणूक केला असल्याचे मिळून आल्याने सदरचा माल पंचासमक्ष जप्त करुन अटक आरोपी नामे- विशाल दादाजी सांगोळे यांना सदर मालाबाबत विचारणा केली असता, सदर देशी/विदेशी दारुचा माल नामे निर्मल अकंलु धमगाये, रा. कोरची ता. कोरची जि. गडचिरोली याचेकडून अवैधरित्या देशी/विदेशी दारु विकत घेवून दिनांक २५/०७/२०१७ रोजी पुरवठा केला असल्याचे सांगितले.

यावरुन नमुद चारही आरोपीताविरुध्द पोस्टे कुरखेडा येथे महा. दारुबंदी कायदा-१९४९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास चालु आहे.

२) दुसऱ्या एका घटनेमध्ये मिळालेल्या गुप्त बातमीदाराच्या खबरेवरुन नामे. श्रीमती कांता मोतीमल माखीजा, तसेच सौ. कौशल्या अशोक अडवानी दोन्ही रा. कुरखेडा, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली यांचे घराची प्रोव्ही बाबत घरझडती घेतली असता त्यांचे घरातून अवेधरित्या देशी दारुच्या १३५ नग निपा किंमत ८१००/- चा माल जप्त केला आहे.

अशा दोन्ही गुन्हयातील देशी-विदेशी दारुचा माल किंमत ११,२९,८६०/- रु. चा माल जप्त केला.

सदर कारवाई मा. पोलीस अधिक्षक सो. यांचे आदेशान्वये तसेच मा. अपर पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक यशवंत कृ. नलावडे, सहा.फौ. करकाडे, पोहवा. भाऊराव बोरकर, प्रेमकुमार दुर्गे, प्रमोद वाळके, नापोकॉ. नरोटे, पोशि. चवारे, साखरे, चापोशि. चौरे, मोहुर्ले यांनी एकत्रितरित्या पार पाडली आहे.


GOA
GOA
GOA
GOA
GOA
GYPSY
GYPSY